महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे

# कलम १९(ब)(३) अन्वये भूमि संपादनाचा

म.रा.र.वि.म.
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# अतिरिक्त/पुरवणी निवाडा

## मूळ अधिसूचना दि. १९/०५/२०२१

---

**प्रयोजन :-** पुणे (पूर्व) चक्राकार मार्ग (राज्यमार्ग (विशेष) क्र. १) प्रकल्पासाठी भूसंपादन...

---

## गाव- मौजे गावडेवाडी, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे

---

## जमिन गट नं २१ मधील संपादन क्षेत्रातील बांधकामाचे सुधारित मूल्यांकन अहवालानुसार देयपात्र रकमेचा अतिरिक्त / पुरवणी निवाडा.

---

-: संपादन मंडळ :-
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या),
शिबीर कार्यालय, पुणे

---

MSRDC, Pune
(Land Section)

| | |
|---|---|
| Add. Collector | |
| Dy. Collector | |
| Inward No. | 1364 |
| Date | 13/3/25 |
| Sign. of O/s | |

# पुणे (पूर्व) चक्राकार मार्ग प्रकल्पाकरीता महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १९-ब च्या पोट-कलम (३) नुसार भूमि संपादनाचा अतिरिक्त निवाडा

वाचा :- १) मा. जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समिती, पुणे यांचेकडील मोबदला निश्चितीचे कार्यवृत्त दि.०७/०६/२०२३
२) कलम १९(ब)(३) अन्वये भूसंपादनाचा मूळ निवाडा क्र. एसआर/हवेली/मूळ/गावडेवाडी/२०/२०२१ दि. २२/०३/२०२४
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र. रेशा/मूल्यांकन/४८०/२०२५ दि. १३/०१/२०२५

प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, हवेली
उपविभाग पुणे यांचे कार्यालय
क्र.एसआर/हवेली/मूळ/गावडेवाडी/२०/२०२१
पुणे, दि. २२/०२/२०२५

**विषय :- गाव मौजे गावडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे**
**प्रयोजन- पुणे (पूर्व) चक्राकार मार्ग प्रकल्पाकरीता**
**कलम १५(२) दिनांक १९/०५/२०२१ रोजीच्या**
**मूळ अधिसूचनेप्रमाणे गट नं २१ मधील नंदा शिवाजी महापूरे यांचे**
**संपादन क्षेत्रातील निगडीत घटकाचा (शेड बांधकाम) अतिरिक्त/पुरवणी निवाडा.**

मा. जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समिती, पुणे यांनी वाचा क्र. १ अन्वये पुणे (पूर्व) चक्राकार मार्गासाठी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम दि. १९/०५/२०२१ रोजीची कलम १५(२) खालील अधिसूचना आणि दि. १७/०५/२०२२ रोजीचे कलम १८(२) खालील अधिसूचनेमध्ये नमूद संपादित करावयाच्या जमिनीचा महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १९(ब)(३) अन्वये मोबदला निश्चितीस मान्यता प्रदान केली आहे.

मा. जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १९(ब)(३) अन्वये निर्धारीत करून दिलेल्या मोबदल्याला अनुसरून या कार्यालयाने वाचा क्र. २ अन्वये मौजे गावडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे या गावातील संपादनाखालील जमिनीचा विनासंमती निवाडा दिनांक २२/०३/२०२४ रोजी जाहिर केला आहे. सदर निवाड्यान्वये गट नं २१ मधील नंदा शिवाजी महापूरे यांचे ०० हे. ०१.२५ आर क्षेत्र संपादन करण्यात आले आहे. तथापी सदर निवाडा जाहीर करतेवेळी गट नं २१ मधील नंदा शिवाजी महापूरे यांचे बांधकाम शेडचे अंतिम मूल्यांकन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग यांचे कार्यालयाकडून अप्राप्त असल्याने ते निवाड्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाही.

तथापी उक्त निवाडा जाहीर झाल्यानंतर मौजे गावडेवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथील जमिन गट नं २१ मधील नंदा शिवाजी महापूरे यांचे संपादन क्षेत्रातील शेड बांधकामाचे अंतिम मूल्यांकन कार्यवाही अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग यांचेकडील पत्र क्र रेशा/मूल्यांकन/४८०/२०२५ दि. १३/०१/२०२५ अन्वये प्राप्त झाले आहे. सदर अहवालानुसार नंदा शिवाजी महापूरे यांचे संपादन क्षेत्रातील शेड बांधकामाची रक्कम रुपये ३१६८९९/- इतकी असून भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना खालीलप्रमाणे मोबदला रक्कम देय होत आहे.

| अ.क्र. | घटक | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | बांधकामाची मोबदला रक्कम (शेड बांधकाम) | ३१६८९९/- |
| २ | दिलासा (Solatium) १००% | ३१६८९९/- |
| **३** | **विनासंमती निवाड्याकरीता एकूण निर्धारित मोबदला (अ.क्र. १+२)** | **६३३७९८/-** |
| ४ | आस्थापना शुल्क २ टक्के | १२६७६/- |
| ५ | कार्यालयीन सोई-सुविधा शुल्क ०.७५ टक्के | ४७५३/- |
| **६** | **एकूण निवाडा रक्कम (अ.क्र. ३ ते ५)** | **रू.६५१२२७/-** |
| | **अक्षरी एकूण रक्कम रूपये सहा लक्ष एक्कावन्न हजार दोनशे सत्तावीस रुपये मात्र** | |

# * भूसंपादनाचा अतिरिक्त / पुरवणी निवाडा *

मी, डॉ. यशवंतराव माने, प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हवेली, उपविभाग पुणे, जिल्हा पुणे, महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १९ (ब) च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारीतेत, याद्वारे कलम १५(२) च्या दिनांक १९/०५/२०२१ रोजीच्या प्राथमिक मूळ अधिसूचनेला अनुसरून मौजे गावडेवाडी, ता. हवेली येथील जमिन गट नं २१ मधील निगडीत घटकाबाबत असे घोषीत करतो की,

(१) मौजे गावडेवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील जमीन गट क्र. २१ मधील नंदा शिवाजी महापूरे यांचे ०० हे. ०१.२५ आर क्षेत्र पुणे (पूर्व) चक्राकार मार्ग या सार्वजनिक प्रयोजनासाठी असलेल्या महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन व कार्यान्वयन करण्यासाठी संयुक्त मोजणीत नमूद चतु:सीमेप्रमाणे दि. २२/०३/२०२४ रोजीच्या मूळ निवाड्याद्वारे संपादित करण्यात आले आहे.

(२) सदर संपादन करण्यात आलेल्या क्षेत्रातील राहिलेल्या निगडीत घटकांचा या निवाड्याद्वारे एकूण देय मोबदला रक्कम रुपये ६३३७९८/- मंजूर करीत आहे. सदर मोबदला रक्कमेमधून नियमानुसार अनर्जित / नजराणा रक्कम, बँक, सोसायटी यांचे बोजे कपात करण्यात येतील.

(३) सदर भूसंपादनातील सुटलेल्या बाबीतील निगडीत घटकांचा एकूण देय मोबदला रक्कम व त्यावर अनुज्ञेय आस्थापना शुल्क व कार्यालयीन सोई-सुविधा शुल्क २.७५ टक्के मिळुन एकूण निवाडा रक्कम रू. ६५१२२७/- मंजूर करीत आहे.

(४) सदर अतिरिक्त निवाडा हा मूळ निवाडा दिनांक २२/०३/२०२४ रोजीचा भाग राहील.

(५) सदर भूसंपादनाचा अतिरिक्त/पुरवणी निवाडा दिनांक २१/०२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरी व कार्यालयाच्या मुद्रांकीत शिक्क्यानिशी घोषीत करण्यात आला आहे.

(६) सदर भूसंपादनाचा निवाडा पुणे जिल्ह्याचे संकेतस्थळ https://pune.gov.in व संपादन संस्थेचे संकेतस्थळ https://msrdc.in यावर प्रसिध्द करणेत आले आहेत.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : २१/०२/२०२५**

उपविभागीय अधिकारी हवेली
SUB DIVISIONAL OFFICER, HAVELI SUB DN.
PUNE
पुणे

(डॉ. यशवंतराव माने)
प्राधिकृत भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी हवेली,
उपविभाग पुणे.

प्रत :- १) मा. जिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय) पुणे
२) मा. अपर जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिबिर कार्यालय पुणे
यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिबिर कार्यालय पुणे यांना माहितीसाठी व उक्त निवाड्यानुसार अनुदान जमा करणेकामी रवाना.